PRAVIN C
PUBLICATION

प्रो. प्रविण चोरमले

# माहिती अधिकार कायदा 2005

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 आणि माहिती तंत्रज्ञान कायदा 2000

'कंबाईन मुख्य - गट ब आणि क' साठी उपयुक्त



प्रश्नांच्या मायक्रो वर्गीकरणासहित

नवीन अभ्यासक्रमावर आधारित

शंभर टक्के एररलेस पुस्तिका

# कायदे (कंबाईन मुख्य)

लेखन व संकलन : प्रा. प्रविण इंदूमती श्रीराम चोरमले
**Email. :** chormalepravin@gmail.com
pravincpublication@gmail.com

**प्रकाशक :**
**प्रविण सी. पब्लिकेशन**
**ऑफिस No. 6 - 3 रा मजला, निलय कॉम्प्लेक्स, हॉटेल शेतकरीच्या शेजारी, आनंद नगर, पुणे - 411051**
**Email. :** pravincpublication@gmail.com
**Telegram :** Pravinchormaleanalysis

© लेखकाधिन

*All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without permission. Any person who does any unauthorised act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.*

आवृत्ती पहिली : फेब्रुवारी 2026

**मूल्य ₹ 110/-**

अक्षर जुळवणी/मांडणी : **Pravin_C_Publication Team, Pune**

मुखपृष्ठ : Urban Pixels.in

**विशेष सूचना :**

पुस्तकातील माहिती शक्य तेवढी अद्ययावत व अचूक देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही नजरचुकीने काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिल्यास योग्य त्या सूचनांचा पुढील आवृत्तीत आवश्य विचार करू. तसेच पुस्तक वाचताना काही समस्या निर्माण झाल्यास 9700529393 या भ्रमणध्वनी क्रमांकावर कॉल करून प्रत्यक्ष निराकरण करू शकता. तसेच विविध संकेतस्थळ, विविध संदर्भग्रंथांचा उपयोग करून पुस्तकाची रचना केली आहे. तरी लेखक, प्रकाशक, विक्रेता सर्व बाबींशी सहमत असेलच असे नाही.

# प्रस्तावना



**नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,**

2026 मध्ये होणाऱ्या कंबाइन मुख्य गट ब आणि गट क साठी सर्वोत्तम Analysis बुक उपलब्ध केलेले आहेच. या पुस्तकांची पृष्ठ मर्यादा लक्षात घेऊन आपण स्वतंत्रपणे (1) कायदा, (2) सुदुर संवेदन - ICT आणि (3) पर्यावरण ही नवीन पुस्तके उपलब्ध करून देत आहोत.

यापैकी 'कायदा' हे पुस्तक अतिशय सोप्या भाषेत, परिक्षाभिमुख, अचुक आणि पूर्णत: Update करून उपलब्ध करून देत आहोत.

कंबाइन मुख्य गट ब आणि गट क च्या परिक्षेमध्ये (3) कायदे कमीतकमी 5 गुणांसाठी विचारले जाती. त्या दृष्टीने हे पुस्तक परिपूर्ण करण्यात आले असून. त्यामध्ये आयोगांच्या सर्व प्रश्नांचा समावेश देखील करण्यात आला आहे.

हे पुस्तक स्वतंत्र देण्यात येत असले तरी कंबाइन मुख्य गट ब आणि गट क 2026 हे Analysis पुस्तक घेणाऱ्यांना विशेष सवलतीमध्ये Pravin C Publication या website वरून खरेदी केल्यास देण्यात येईल.

लवकरच बाकी दोन पुस्तके आणि 25000+ The Analyst हे पुस्तक उपलब्ध करून देण्यात येईल.

"Top Score Analysis" म्हणून ओळखली जाणारी आपली पुस्तके आपल्या यशामध्ये नक्कीच महत्वाची ठरतील, यात शंका नाही.

आपल्या सर्वांना येणाऱ्या कंबाइन मुख्य परिक्षेसाठी खुप खुप शुभेच्छा....!

आपलाच,

प्रविण इंदुमती श्रीराम चोरमले

धन्यवाद.



# माहितीचा अधिकार अधिनियम

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम

# माहिती तंत्रज्ञान कायदा

# INDEX

## 1 माहिती अधिकार अधिनियम, 2005
## The Right to Information Act, 2005


| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| (A) | माहिती अधिकाराविषयी आंतरराष्ट्रीय प्रयत्न | 6 |
| (B) | भारतातील विशेष प्रयत्न | 7 |
| (C) | महाराष्ट्रातील प्रयत्न | 8 |
| (D) | RTI कायद्याचा उद्देश | 8 |

| | | |
|---|---|---|
| (1) | माहिती अधिकार अधिनियम, 2005 | 9 |
| 1.1 | प्रकरण 1 : प्रास्ताविक | 9 |
| 1.2 | प्रकरण 2 : माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने | 11 |
| 1.3 | प्रकरण 3 : केंद्रीय माहिती आयोग (The Central Information Commission) | 19 |
| 1.4 | प्रकरण 4 : राज्य माहिती आयोग (The State Information Commission) | 21 |
| 1.5 | प्रकरण 5 : माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये, अपील व शास्ती | 24 |

# INDEX




| | | |
|---|---|---|
| 1.6 | प्रकरण 6 : संकिर्ण (Miscellaneous) | 27 |
| (2) | थोडक्यात : माहिती अधिकार अधिनियम - 2005 | 35 |
| (3) | माहिती अधिकार कायद्यातील नव्या दुरुस्त्या | 37 |
| (4) | केंद्रीय - राज्य माहिती आयोग | 38 |
| (5) | अनुसूच्या | 38 |
| (6) | माहिती अधिकाराची अर्ज प्रक्रिया | 40 |
| (7) | आयोगाचे प्रश्न | 41 |


## 2 महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015
### The Maharashtra Right to Public Service Act, 2015


| | | |
|---|---|---|
| 1 | लोकसेवा हक्क कायद्याविषयी भारतातील प्रयत्न | 61 |
| 2 | महाराष्ट्रातील प्रयत्न | 61 |
| 3 | कायदा - कलम 1 ते 30 | 62 |
| 4 | थोडक्यात कायद्याची उजळणी | 71 |
| 5 | कायद्यासंदर्भात प्रश्न-उत्तरे स्वरूपात माहिती | 73 |
| 6 | अर्ज प्रक्रिया | 78 |
| 7 | केंद्रिय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग - अध्यक्ष आणि सदस्य | 78 |
| 8 | आयोगाचे प्रश्न | 79 |


## 3 माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000
### Information Technology Act - 2000


| | | |
|---|---|---|
| (1) | अधिनियमाचा उद्देश : | 86 |
| (2) | आयटी कायदा 2000 चे महत्त्व / सुधारणा | 87 |
| (3) | आयटी कायदा 2000 | 88 |
| 3.1 | प्रकरण I : प्रारंभिक (Preliminary) | 88 |
| 3.2 | प्रकरण II : डिजिटल सही व इलेक्ट्रॉनिक सही | 93 |
| 3.3 | प्रकरण III : इलेक्ट्रॉनिक शासन | 94 |
| 3.4 | प्रकरण IV : इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचे आरोपन, अभिस्वीकृती व पाठवणी | 94 |
| 3.5 | प्रकरण V : सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेख आणि सुरक्षित इलेक्ट्रॉनिक सही | 95 |
| 3.6 | प्रकरण VI : सर्टीफाईंग ऑथोरिटीचे नियमन | 95 |
| 3.7 | प्रकरण VII : इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र (Digital Signature Certificate) | 97 |
| 3.8 | प्रकरण VIII : वर्गणीदाराची कर्तव्य (Duties of Subsoribers) | 98 |
| 3.9 | प्रकरण IX : शिक्षा (Penalties Compensation and Adjudition) | 99 |
| 3.10 | प्रकरण X : सायबर अपील न्यायाधीकरण | 101 |
| 3.11 | प्रकरण XI : अपराध (Offences) | 102 |
| 3.12 | प्रकरण XII : विशिष्ठ प्रकरणी मध्यस्थांना जबाबदारीतून सूट | 105 |
| 3.13 | प्रकरण XII (A) : विद्युत पुरावा परिक्षक | 105 |
| 3.14 | प्रकरण XIII : संकीर्ण (Miscellaneous) | 106 |
| (4) | रद्द करण्यात आलेली कलमे | 109 |
| (5) | दोन सेड्युल / अनुसूच्या | 109 |
| (6) | आयोगाचे प्रश्न | 110 |

# 1 माहिती अधिकार अधिनियम, 2005
# The Right to Information Act, 2005

## (A) माहिती अधिकाराविषयी आंतरराष्ट्रीय प्रयत्न

- **स्वीडन** या देशाने सर्वप्रथम **1766** मध्ये नागरिकांना माहितीचे स्वातंत्र्य पुरविण्याविषयी व्यवस्था केली.

| इतर देश : | |
|---|---|
| 1) | **स्विडन** : 1766 |
| 2) | **कोलंबिया** : 1888 |
| 3) | **फिनलँड** : 1951 |
| 4) | **अमेरिका** : 1966 (फ्रिडम ऑफ इन्फॉरमेशन ॲक्ट) |
| 5) | **डेन्मार्क** : 1970 |
| 6) | **नॉर्वे** : 1970 |
| 8) | **फ्रान्स** : 1978 |
| 7) | **ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड** : 1982 |
| 9) | **कॅनडा** : 1983 |
| 10) | **युनायटेड किंग्डम** : 1985 |
| 11) | **ग्रीस** : 1986 |
| 12) | **ऑस्ट्रीया** : 1987 |
| 13) | **इटली** : 1990 |
| 14) | **आयर्लंड** : 1997 |
| 15) | **बल्गेरिया** : जून 2000 |
| 16) | **चीन** : 2005 (द फ्रिडम ऑफ गव्हर्नमेंट इन्फॉरमेशन) |
| 17) | **भारत** : 2005 |

### मानवाधिकाराचा वैश्विक जाहिरनामा : 1948 :

- युनोच्या आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात **मानवाधिकाराचा वैश्विक जाहिरनामा 1948** घोषित करण्यात आला. त्यानुसार, ''प्रत्येकाला कोणत्याही आंतरराष्ट्रीय सीमांची मर्यादा न पाळता कोणत्याही माध्यमांद्वारे माहिती आणि कल्पना मिळविण्याचा आणि प्राप्त करण्याचा अधिकार आहे. आणि **नागरिकांचे माहितीचे स्वातंत्र्य हे मूलभूत स्वातंत्र्य आहे.''**
- **10 डिसेंबर 1948** ला हा जाहिरनामा (UDHR) आमसभेने स्वीकारले.
- **10 डिसेंबर** हा **'जागतिक मानवाधिकार दिन'** म्हणून 4 डिसेंबर 1950 रोजी स्वीकारण्यात आला. याच दिवशी 'जागतिक नोबेल शांतता पुरस्कार' दिला जातो.
- या जाहिरनाम्यात **एक सरनामा व एकुण 30 कलमे** आहेत.

### पहिल्या भागातील सुरुवातीची 2 कलमे ही सर्व मानवी हक्कांच्या पायाभूत तत्त्वांना अधोरेखित करतात.

- **कलम 1 –** सर्व मानव जन्मत: स्वतंत्र आहेत आणि प्रतिष्ठा व हक्कांबाबत समान आहे.
- **कलम 2 –** कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येकाला सर्व मानवी हक्क आणि स्वातंत्र्ये उपलब्ध असतील.

### कलम 3 ते 21 दरम्यान नागरी आणि राजकीय हक्क नमूद आहेत.

| | |
|---|---|
| **कलम 3** | जीवित, स्वातंत्र्य आणि सुरक्षेचा हक्क. |
| **कलम 4** | गुलामगिरी आणि गुलामांच्या व्यापारापासून स्वातंत्र्य. |
| **कलम 5** | छळ आणि अमानवी शिक्षेपासून मुक्तता. |
| **कलम 6** | कायद्यासमोर व्यक्ती म्हणून मान्यतेचा हक्क. |
| **कलम 7** | कायद्यासमोर समानता. |
| **कलम 8** | न्यायालयीन उपायांचा हक्क. |
| **कलम 9** | मनमानी अटक किंवा तडीपारीपासून स्वातंत्र्य. |
| **कलम 10** | रास्त सुनावणी आणि खुल्या सुनावणीचा हक्क. |
| **कलम 11** | अपराध सिद्ध होईपर्यंत निरपराध म्हणविण्याचा हक्क. |
| **कलम 12** | एकांतवास आणि प्रतिष्ठेचा हक्क. |
| **कलम 13** | संचार स्वातंत्र्य |
| **कलम 14** | राजकीय आश्रयाचा हक्क |
| **कलम 15** | राष्ट्रीयत्वाचा हक्क |
| **कलम 16** | विवाह आणि कुटुंब संरक्षणाचा हक्क. |
| **कलम 17** | मालमत्तेचा हक्क. |
| **कलम 18** | विचार, विवेक आणि धार्मिक स्वातंत्र्य. |
| **कलम 19** | **मत, अभिव्यक्ती आणि माहितीचे स्वातंत्र्य.** |
| **कलम 20** | शांततेने एकत्र येण्याचा आणि संघ स्थापण्याचे स्वातंत्र्य. |
| **कलम 21** | शासनामध्ये सहभागी होण्याचा आणि सार्वजनिक सेवेमध्ये समान प्रवेशाचा हक्क. |

### कलम 22 ते 27 अंतर्गत आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा समावेश केला आहे.

| | |
|---|---|
| कलम 22 | सामाजिक सुरक्षिततेचा हक्क. |
| कलम 23 | कामाचा आणि समान कामासाठी समान वेतनाचा हक्क. |
| कलम 24 | विश्रांती आणि निवांतपणाचा हक्क. |
| कलम 25 | दर्जायुक्त जीवनमानाचा हक्क. |
| कलम 26 | शिक्षणाचा हक्क. |
| कलम 27 | समूहाच्या सांस्कृतिक जीवनामध्ये सहभागी होण्याचा हक्क. प्रत्येक व्यक्तीला उपरोक्त हक्क आणि स्वातंत्र्याची पूर्तता होईल अशा सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय सुस्थितीचा हक्क आहे. |
| कलम 28 | सर्व मानवी हक्क उपभोगता येतील अशा संदर्भाचा उल्लेख कलम 28 |
| कलम 29 | इतरांचे हक्क आणि स्वातंत्र्याला मान्यता व आदर मिळविण्याच्या **उद्देशा**ने आणि नैतिकता, सार्वजनिक व्यवस्था व सर्वसामान्य कल्याण याकरिता उपरोक्त हक्कांच्या आणि स्वातंत्र्याच्या अंमलावर मर्यादा येतील. – (कर्तव्य) |
| कलम 30 | उपरोक्त हक्क आणि स्वातंत्र्याला बाधा आणणाऱ्या कोणत्याही कृती करण्याचा हक्क कोणत्याही राष्ट्राला, गटाला किंवा व्यक्तिला नाही. |

- **रिओ परिषद (1992) :** ''आपल्या परिसरात होणारे प्रदूषण व त्याच्यामुळे होणाऱ्या नुकसानीची माहिती सर्वसामान्य नागरिकाला होणे आवश्यक आहे.''
- IMF, WB या आंतरराष्ट्रीय संस्थांनी 1990 नंतर वित्तीय पुरवठा करताना सार्वजनिक क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक व्हावा म्हणून सदरचा कायदा करण्याची अट ठेवली.
- **कायदा नसणारे देश :** फिजी, म्यानमार, इंडोनेशिया, घाना, अर्जेंटिना.

### 28 सप्टेंबर : आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन :

- बल्गेरिया येथे **28 सप्टेंबर, 2002** रोजी माहिती अधिकारासंबंधातील कृतीशील संघटना स्थापन झाल्याबद्दल
- कायद्याच्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने **'6 ते 12 ऑक्टोबर'** रोजी माहिती अधिकार सप्ताह (भारत) महाराष्ट्रात देखील साजरा होतो.

## (B) भारतातील विशेष प्रयत्न :

- माहितीचे नवे पर्व यालाच सुराज्याच्या दिशेने जाणारे दुसरे स्वातंत्र्य म्हणतात. **नव्वदीचे दशक हे माहितीच्या विस्फोटाचे दशक** म्हणून ओळखले गेले.
- RTI कायदा गांधीजींची विश्वस्त ही संकल्पना स्वीकारतो.
- या संकल्पनेनुसार शासनकर्ते सार्वजनिक संस्थांमधील माहितीचे मालक नसून **केवळ विश्वस्त** आहेत.
- माहिती अधिकार कायद्यापूर्वी माहितीवर मर्यादा असणारे खालील विविध कायदे भारतात लागू होते.
  1) शासकीय गुपित कायदा, 1923.
  2) भारतीय पुरावा कायदा, 1872.
  3) भारतीय साक्ष अधिनियम – 2023
  4) केंद्रीय नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1964.
- 1975 च्या आसपास आणीबाणीमुळे माहिती दडपणे, वृत्तपत्रांवर निर्बंध लादणे, सत्तेचा दुरुपयोग करणे इ. घटनांमुळे माहितीच्या अधिकाराविषयी चर्चा घडू लागल्या. याचा परिणाम 1977 च्या निवडणुकीत दिसून आला.

### भारतातील माहिती अधिकार अधिनियमाची निर्मिती व विकासातील विविध घटना व संघटनांचे योगदान :

- परिक्षेच्या दृष्टीकोनातून विचार करता, आयोगाने RTI शी संबंधित महत्वाचे खटले व संघटना (NGO) याबाबत काही प्रश्न विचारलेले आहेत. त्यामुळे आपणाला याबाबत काही प्रमाणात माहिती असणे गरजेचे आहे.

### महत्वाचे खटले :

| | |
|---|---|
| 1) | बेनेट कोलमन VS युनियन ऑफ इंडिया खटला – 1973: |
| | या घटल्यामध्ये, सवोच्च न्यायालयाने, न्युज प्रिंट पॉलिसी 1972-73 ही गैरसंविधानिक ठरविण्यात आली. आणि या खटल्यामध्ये माहिती स्वातंत्र्याचा उल्लेख केला. |
| 2) | उत्तर प्रदेश VS राजनारायण व इतर – 1975 |
| 3) | मेनका गांधी VS युनियन ऑफ इंडिया – 1978 |
| 4) | प्रभा दत्त VS युनियन ऑफ इंडिया – 1982 |
| 5) | इंडियन एक्स्प्रेस न्युजपेपर्स प्रा. लि. VS युनियन ऑफ इंडिया – 1985 |
| 6) | श्री. कुलवार VS जयपुर मनपा – 1986 |
| | या खटल्यामध्ये घटनेच्या कलम 19 अंतर्गत अभिव्यक्ती व विचार स्वातंत्र्यामध्ये स्पष्टपणे माहितीचा अधिकार समाविष्ट होतो. कारण माहितीशिवाय भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य पूर्णपणे वापरले जाऊ शकत नाही. |
| 7) | शीला बारसे VS महाराष्ट्र शासन – 1987 |
| 8) | L. I. C VS प्रो. मनुभाई डी. शाह – 1992 |

| | |
|---|---|
| 9) | टाटा प्रेस लि. VS महानगर टेलिफोन निगम लि. व इतर – 1995 |
| 10) | पिपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरूद्ध युनियन ऑफ इंडिया – (2004) – यामध्ये माहितीच्या अधिकाराची व्याख्या करण्यात आली. |
| 11) | माहितीचा अधिकार तसेच पर्यावरणाचे व मानवी आरोग्याचे रक्षण करण्यासाठी असलेला सामाजिक सहभाग अधिकार हे संविधानाच्या कलम 21 मध्ये असल्याचा निर्वाळा – रिसर्च फाउंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी अँड नॅचरल रिसोर्स पॉलिसी VS युनियन ऑफ इंडिया जे. टी. 2007 (11) SC – 49 मध्ये नमुद केले गेले. |

- **मजदूर किसान शक्ती संघटना (MKSS–1987) :** या संघटनेच्या माध्यमातून **अरुणा रॉय, निखिल डे, शंकरसिंह** इ. सामाजिक कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न केले.
- यांच्या अथक प्रयत्नांतून राजस्थानातील रोजगार हमी योजनेत जनसुनावणी, सामाजिक लेखा परीक्षणास सुरुवात झाली.
- यामुळे रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार, अनियमितपणा माहितीच्या माध्यमातून दाखवून दिला.

### काही संघटना :

1) अखिल भारतीय ग्राहक पंचायत.
2) National Campaign for People's Right to information **(NCPRI)** या संघटनेने भारताच्या कायद्याचा मसुदा बनवण्यात मोलाचे कार्य केले. 1996 मध्ये या गटाने तीव्र मागणी केली, त्यामुळेच **प्रेस कौन्सील ऑफ इंडिया ने न्या. पी. बी सावंत** यांच्या अध्यक्षतेखाली एक मसुदा तयार केला.
3) **प्रेस कौन्सिल :** भारताच्या कायद्याचा मसुदा बनवला. (मसुदा अध्यक्ष : एच.डी. शौरी)
   - ➢ 1997 मध्ये भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये आपापल्या कार्यक्षेत्रात RTI कायदा करण्याचे आवाहन करण्यात आले त्यानुसार व त्यानंतर खालील राज्यांनी आपआपल्या राज्यात स्वतःचे कायदे लागू केले.
     - **1) तामिळनाडू :** 1997 (पहिले राज्य)
     - **2) गोवा :** 1997
     - **3) राजस्थान :** 2000
     - **4) कर्नाटक :** 2000
     - **5) दिल्ली :** 2001
     - **6) महाराष्ट्र :** 2002
     - **7) आसाम :** 2002
     - **8) मध्य प्रदेश:** 2003
     - **9) जम्मू-काश्मीर :** 2003
   - ➢ केरळ आणि ओरिसा विधेयक.
   - ➢ उत्तर प्रदेश (कोड) 2000
   - ➢ 2003 मध्ये माहितीच्या स्वातंत्र्याचा कायदा NDA सरकारने आणला; परंतु त्या विषयीची अधिसूचना निघू शकली नाही. तत्पूर्वी श्री. अण्णा हजारे यांनी 2001 मध्ये माहिती अधिकारासाठी जन आंदोलन उभारले होते.

- **RTI चा पहिला अर्ज : 12 ऑक्टोबर 2005.**
  - ➢ शाहीद रझा बर्नी यांनी पुण्याच्या पोलीस ठाण्यात दाखल केला.

## (C) महाराष्ट्रातील प्रयत्न :

- महाराष्ट्राने **23 सप्टेंबर, 2002** रोजी माहितीचा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने पारित करुन अंमलात आणला. असा कायदा करणारे **महाराष्ट्र हे 6 वे राज्य ठरले.**
- महाराष्ट्राच्या या कायद्याचा आधार घेत केंद्र शासनाने 2005 साली केंद्राचा कायदा बनवला.
- महाराष्ट्राने केलेल्या कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. यामध्ये माधव गोडबोले, सत्यरंजन साठे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या. चपळगावकर यांचा समावेश होता.
- **1997 मध्ये विजयकुमार कड** हे जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून जालना येथे कार्यरत होते. तेथे त्यांनी पुरवठाविषयक माहिती वर्तमानपत्रात जाहीर करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे पुरवठा विभागात पारदर्शकता वाढली.
- परिणामी भ्रष्टाचारास आळा बसला. **माहिती अधिकार दिन पाळणारी पहिली महानगरपालिका सोलापूर** मनपा होय.
- त्यानंतर पुणे मनपाने असाच उपक्रम सुरू केला.

## (D) RTI कायद्याचा उद्देश :

1) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक **पारदर्शकता आणि उत्तरदायित्व** निर्माण करणे.
2) सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धत आखून देण्याकरिता.
3) **केंद्रीय माहिती आयोग** आणि **राज्य माहिती आयोग** घटित करण्याकरिता आणि संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे.
4) लोकशाहीमध्ये माहितीगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता राखणे, तसेच **भ्रष्टाचाराला आळा** घालणाच्या व राज्य शासन व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविणे.
5) प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनांचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहेत.
6) माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे.

- या कायद्यात 6 प्रकरणे व 31 कलमे आणि 2 अनुसूची आहेत, त्याची सूची खालीलप्रमाणे :

| | प्रकरण (Chapters) | कलमे (Section) |
|---|---|---|
| 1 | प्रास्ताविक | कलम 1 ते 2 |
| 2 | माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने | कलम 3 ते 11 |
| 3 | केंद्रीय माहिती आयोग | कलम 12 ते 14 |
| 4 | राज्य माहिती आयोग | कलम 15 ते 17 |
| 5 | माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये, अपील व शास्ती | कलम 18 ते 20 |
| 6 | संकीर्ण | कलम 21 ते 31 |

## (1) माहिती अधिकार अधिनियम, 2005

| | |
|---|---|
| ➨ माहिती अधिकार अधिनियम | 2005 |
| ➨ विधेयक लोकसभेत सादर | 23/1/2004 |
| ➨ लोकसभेत संमत | 11 मे 2005 |
| ➨ राष्ट्रपतीची स्वाक्षरी | 15 जून 2005 |
| ➨ राजपत्रात प्रसिद्ध | 21 जून 2005 |
| ➨ देशभरात लागू | 12 ऑक्टो. 2005 |
| ➨ दुरूस्ती | 1 ऑगस्ट 2019 |

**Q. Pattern :**

➨ या अधिनियमाचा उद्देश नाही :
➨ सरकार दरबारी असणारी सर्वा माहिती पुरविणे
➨ खाजगी माहिती मिळविणे
➨ शासकीय नोकरांवर भारतीय जनतेचा अंकुश निर्मिती करणे
➨ शासकीय गुपिते कायदा. 1923 निष्प्रभावी (निरसित) करणे.

- परिक्षेच्या दृष्टीकोनातून अती महत्वाची कलमे : 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 1,1 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 24, 31.

## 1.1 प्रकरण 1 : प्रास्ताविक

### कलम 1 : संक्षिप्त नाव, व्याप्ती प्रारंभ (Short Title, Extent, Commencement)

(1) **संक्षिप्त नाव :** माहितीचा अधिकार अधिनियम, 2005.

(2) **व्याप्ती :** संपूर्ण भारत. (जम्मु काश्मिर सहित - 2019)

(3) **प्रारंभ :** या अधिनियमाच्या कलम 4(1), कलम 5(1) व (2), कलम 12, 13, 15, 16, 24, 27, 28 (एकुण 9 कलम) ताबडतोब अंमलात येतील. (15 जून 2005 पासूनच) त्याच्या उर्वरित तरतुदी तो अधिनियम पारित झाल्यापासून **120 व्या दिवशी दि. 12 ऑक्टोंबर, 2005** रोजी अंमलात येतील.

**टीप : जम्मू काश्मीर पुरर्नचना कायदा, 2019 च्या कलम 95 व 96 (कायदा 95) नुसार माहितीचा अधिकार अधिनियम आता जम्मू-काश्मीर सहित संपूर्ण भारतात दि. 31 ऑक्टोंबर, 2019 रोजी लागू झाला आहे.**

### कलम 2 : व्याख्या (Definitions)


| कलम | तरतूद | व्याख्या |
|---|---|---|
| 2(a) | समुचित शासन (Appropriate Government) | 1) केंद्र सरकार किंवा संघराज्य क्षेत्र प्रशासन स्थापन/घटित/मालकी/नियंत्रणाखाली/ त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीद्वारे ज्यांना मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात येतो, अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या बाबतीत, **केंद्र सरकार** असा आहे.<br>2) राज्य शासनांकडून स्थापन/घटिक/मालकी/नियंत्रणाखाली असणाऱ्या अथवा त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीद्वारे ज्यांना मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात येतो, अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या बाबतीत, राज्यशासन असा आहे. |
| 2(b) | केंद्रीय माहिती आयोग (Central Information Commission) | • मा.अ.अधि. 2005 **कलम 12(1)** खाली स्थापन करण्यात आलेला केंद्रीय माहिती आयोग असा आहे. |
| 2(c) | केंद्रीय जन माहिती आयुक्त अधिकारी (Central Public Information Officer) | • **कलम 5(1)** अन्वये पदनिर्देशित करण्यात आलेला **'केंद्रीय जन माहिती अधिकारी'**, असा आहे आणि यात **कलम 5(2)** अन्वये अशा प्रकारे पदनिर्देशित करण्यात आलेल्या **'केंद्रीय सहायक जन माहिती अधिकाऱ्याचाही'** समावेश होतो. |

| | | |
|---|---|---|
| 2(d) | मुख्य माहिती आयुक्त (Chief Information Commissioner) आणि माहिती आयुक्त (Information Commissioner) | • मा.अ.अधि. 2005 **कलम 12(3)** अन्वये नियुक्त करण्यात आलेला' **मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयुक्त'** असा आहे. |
| 2(e) | सक्षम प्राधिकारी (Competent Authority) | 1) लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या बाबतीत किंवा अशा प्रकारच्या सभा असणाऱ्या संघराज्य क्षेत्राच्या बाबतीत, **सभापती** आणि राज्यसभा किंवा राज्य विधानपरिषद यांच्या बाबतीत, **अध्यक्ष.**<br>2) सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत, भारताचा **मुख्य न्यायमूर्ती.**<br>3) उच्च न्यायालयाच्या बाबतीत, उच्च न्यायालयाच्या **मुख्य न्यायमूर्ती.**<br>4) **राष्ट्रपती किंवा राज्यपाल,** संविधानाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या अन्य प्राधिकरणांच्या बाबतीत.<br>5) संविधानाच्या अनुच्छेद 239 अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक. |
| 2(f) | माहिती (Information) | कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापन (Memos), ई–मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविधान, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल, अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. |
| 2(g) | विहित (Prescribed) | • समुचित शासन किंवा सक्षम प्राधिकारी यांनी या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे. |
| 2(h) | सार्वजनिक प्राधिकरण (Public Authority) | • याचा अर्थ,<br>a) संविधानाद्वारे किंवा तद्न्वये ;<br>b) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;<br>c) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ;<br>d) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यामध्ये,<br>1) समुचित शासनाची मालकी किंवा नियंत्रण किंवा त्यांच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय.<br>2) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो. |
| 2(i) | अभिलेख (Record) | • यामध्ये खालील यांचा समावेश होतो.<br>a) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल ; (any document, manuscript and file.)<br>b) एखाद्या दस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म, मायक्रोफिश आणि प्रतिरूप प्रत; (any microfilm, microfiche and fasimile copy of a document.)<br>c) अशा मायक्रोफिल्ममध्ये संग्रहित केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही नक्कल [any reproduction of image or images embodied in such microfilm (whether enlarged or not)] ;<br>d) संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य (any other material produced by a computer or any other device.) |

- सुज्ञ नागरिक अशा अडचणी समजून घेतात व तपासणीनंतर आवश्यक तेवढ्याच माहितीची यादी करून मागतात, व ती देणे सहज शक्य असते.
- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने या कायद्यांतर्गत पुरवावयाच्या माहितीसाठी व टपालखर्चासाठी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच पुरेशी आर्थिक तरतूद केली पाहिजे.

## कलम 8 : माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद (Exemption From Disclosire of Information)

| | | |
|---|---|---|
| 1. | या अधिनियमानुसार कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही. | |
| | a) | जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्त्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना, बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल अशी माहिती. |
| | b) | कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास **स्पष्टपणे मनाई केली** आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल. |
| | c) | जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल. |
| | d) | वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल. |
| | e) | एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती. |
| | f) | विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती. |
| | g) | जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षेच्या दृष्टीने विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले साहाय्य ओळखता येईल. |
| | h) | ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल. |
| | i) | मंत्रीमंडळाची कागदपत्रे, तसेच, मंत्रीपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांचे अभिलेख. |
| | j) | जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खासगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती. |
| | | **परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.** |
| 2. | माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल तर सार्वजनिक प्राधिकरण ती माहिती पाहण्यास परवानगी देऊ शकेल. | |




| | |
|---|---|
| 3. | **कलम 6 अन्वये** ज्या दिनांकास विनंती केली असेल त्या दिनांकापासून **20 वर्षीपूर्वी झालेली कोणतीही घटना,** प्रसंग किंवा दिनांकासंबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल. |

## कलम 9 : विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे (Grounds for Rejection to Access in Certain Cases)

- एखादी माहिती पुरविण्याच्या विनंतीमुळे जर राज्याव्यतिरिक्त अन्य **एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन** होत असेल तर, कलम 8 च्या तरतुदींना बाधा न येऊ देता केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकाऱ्यास माहिती पुरवण्याची विनंती नाकारता येईल.


## कलम 10 : पृथक्करणीयता (Severability)

1) जर विनंती अर्ज अपवाद केलेल्या माहितीमुळे नाकारण्यात आली असेल तेव्हा अपवाद करण्यात आलेल्या कोणत्याही माहितीचा अंतर्भाव नसेल आणि अशी माहिती अपवाद केलेल्या माहितीपासून व्यवस्थितपणे पृथक (वेगळे) करता येत असल्यास अशी माहिती देण्यात येईल.
2) वरील अभिलेखातील एखाद्या भागातील माहिती देताना केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकारी, अर्जदारास –
   a) अशा माहितीचा पृथक केल्यानंतरचा उर्वरित भाग पुरवण्यात येईल.
   b) वस्तुस्थितीसंबंधातील कोणत्याही महत्त्वपूर्ण प्रश्नावरील कोणत्याही निष्कर्षासह, ते निष्कर्ष ज्या सामग्रीवर आधारले होते त्या सामग्रीचा निर्देश करून, निर्णयाच्या कारणांची;

c) निर्णय देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पदनाम यांची;


d) त्याने किंवा तिने परिगणना केलेल्या फीचा तपशील आणि अर्जदारांनी जमा करणे आवश्यक असलेली फीची रक्कम यांची; आणि

e) माहितीचा भाग प्रकट न करण्यासंबंधातील निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याच्या बाबतीतील, त्याचे किंवा तिचे हक्क, कलम 19(1) अन्वये किंवा केंद्रीय/राज्य आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा तपशील, कालमर्यादा, प्रक्रिया आणि माहिती पुरविण्याचा इतर कोणताही प्रकार यांसह आकारलेल्या फीची रक्कम किंवा माहिती पुरविण्याचा प्रकार यांची माहिती देणारी नोटीस देईल.




## कलम 11 : त्रयस्थ पक्षाची माहिती (Thrid Party Information)

| | |
|---|---|
| **त्रयस्थ पक्षाकडून माहिती पुरवणे**<br>5 दिवसाच्या आत नोटीस | 1) या अधिनियमांन्वये केलेल्या विनंतीवरून जेव्हा, एखाद्या केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकाऱ्यास त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती अशी विनंती करण्यात आल्यापासून **5 दिवसांच्या आत** त्या विनंतीबाबत आणि केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकारी ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग, प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ पक्षास देईल.<br>➢ त्रयस्थ पक्षाला, अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे, या संबंधात **लेखी किंवा मौखिक** निवेदन सादर करण्यासाठी, आमंत्रित करील आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेण्यात येईल. |
| **लोकहितार्थ माहिती प्रकट करणे** | परंतु, कायद्याने संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्त्वाचे असेल तर ती माहिती प्रकट करण्याची परवानगी असेल. |
| **माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन**<br>10 दिवसाच्या आत म्हणणे | 2) केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात पोटकलम (1) अन्वये त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून **10 दिवसांच्या आत प्रस्तावित माहिती** प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात येईल. |
| **माहिती प्रकट करण्याबाबत निर्णय**<br>30 + 10 = 40 दिवसात | 3) कलम 7 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्रीय/राज्य जन माहिती अधिकारी कलम 6 अन्वये केलेला विनंतीचा अर्ज मिळाल्यानंतर **40 दिवसांच्या आत (30 + 10 दिवस) पोटकलम (2) अन्वये** निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात आलेली असल्यास, ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करावा किंवा करू नये याबाबत निर्णय घेईल आणि त्याच्या निर्णयाची लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास देईल. |
| **अपील** | 4) पोटकलम (3) अन्वये ज्याला नोटीस देण्यात आली असा त्रयस्थ पक्ष त्या निर्णयाविरूद्ध कलम 19 अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार असेल. त्रयस्थ पक्षाने अपिल केल्यास अंतिम निर्णय येईपर्यंत माहिती अर्जदारास देता येत नाही. |




- कलम 2 (n), 7(7), 8 (e), 8 (g), 11 व 19 एकत्रित वाचावेत.


## 1.3 प्रकरण 3 : केंद्रीय माहिती आयोग
**(The Central Information Commission)**


### कलम 12 : केंद्रीय माहिती आयोग घटित करणे (Constitution of Central Information Commission)

| | |
|---|---|
| **स्थापना** | 1) केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे **'केंद्रीय माहिती आयोग'** या नावाने ओळखला जाणारा निकाय, या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याला नेमून दिलेली कार्ये पार पडण्यासाठी घटित करील. |
| **रचना** | 2) केंद्रीय माहिती आयोग पुढील व्यक्तींचा बनलेला असेल,<br>a) मुख्य माहिती आयुक्त आणि<br>b) कमाल 10 इतर केंद्रीय माहिती आयुक्त. |
| **निवड समिती** | 3) मुख्य माहिती आयुक्तांची व माहिती आयुक्तांची **नियुक्ती राष्ट्रपती** पुढील व्यक्तींची मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करील.<br>**अध्यक्ष** : i) प्रधानमंत्री<br>**सदस्य** : ii) लोकसभेतील विरोधी पक्षनेता आणि<br>iii) प्रधानमंत्र्याने नामनिर्देशित करावयाचा एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री. |
| | (**स्पष्टीकरण** : लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून एखाद्या व्यक्तीला मान्यता देण्यात आली नसेल त्याबाबत, लोकसभेतील सरकारच्या विरोधी पक्षांतील सर्वात मोठ्या गटाच्या नेत्यास विरोधी पक्षनेता मानण्यात येईल.) |

## प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने घ्यावयाची दक्षता

- माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपिले ही **अर्धन्यायिक (quasi-judicial)** स्वरूपाची असून, प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते.




## प्रथम अपील – काय पाहावे ?

- अर्ज प्राप्त तारीख, शुल्क दिले आहे का ? दारिद्र्यरेषेखालील आहे का?
- अर्जात नमूद माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे का?
- असल्यास ती या कायद्याप्रमाणे देता येण्यासारखी आहे का ?
- देता येण्यासारखी असल्यास व अर्जदार दारिद्र्यरेषेखालील नसल्यास माहितीचे शुल्क परिगणना करून अर्जदारास कळविले आहे का? तारीख तपासावी.
- अर्जदाराने शुल्क भरले का ? शुल्क भरल्याचे कळविल्याची तारीख तपासावी.
- अर्जदार दारिद्र्यरेषेखालील असल्यास लगेच व नसल्यास शुल्क भरल्यानंतर माहिती दिली आहे का व नसल्यास ती नाकारल्याचा सकारण आदेश दिला आहे का? हे तपासावे.

## प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यास दंड करण्याचे अधिकार नाहीत

1. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील तरतुदींनुसार कसूरदार जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे व संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाईची शिफारस करण्याचे सर्व अधिकार राज्य माहिती आयोगास प्रदान करण्यात आले आहेत.
2. त्यामुळे या अधिनियमांतर्गत एखाद्या जन माहिती अधिकाऱ्यांविरुद्ध प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने दंडात्मक कारवाई करण्याचे किंवा शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे आदेश पारित करण्याची बाब या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे .
3. ज्या प्रकरणात गुणवत्तेवर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांची अशी खात्री पटते, की जन माहिती अधिकारी कायद्यातील तरतुर्दीप्रमाणे अर्जदाराला माहितीच देत नाहीत किंवा देण्याचे टाळतात किंवा चुकीची माहिती देतात इत्यादी.

   म्हणून ते कसूरदार आहेत व त्यांना या कायद्यातील तरतुदीनुसार शास्ती होणे आवश्यक आहे.

   अशा प्रकरणात प्रथम अपिलीय प्राधिकारी त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल शास्ती लादण्यास सक्षम असणाऱ्या राज्य माहिती आयुक्ताकडे पाठवू शकतो.

| 3 री दुरुस्ती | 4 थी दुरुस्ती |
|---|---|
| 8 ऑक्टोबर 2008 | जून 2011 |
| क्र. 22 सचिवालय<br>राष्ट्रीय सुरक्षा समिती या संघटनेचा समावेश करण्यात आला. | 3 संघटनांचा समावेश<br>23. केंद्रीय तपास विभाग<br>24. राष्ट्रीय तपास यंत्रणा<br>25. राष्ट्रीय गुप्तवार्ता नेटवर्क |

| 5 वी दुरुस्ती – | 6 वी दुरुस्ती |
|---|---|
| 2016 | 2023 |
| (1) संघटना समाविष्ठ<br>26. सामरिक सैन्य कमांड | (1) संघटना समाविष्ठ<br>27. CERT-IN<br>**एकूण संघटना – 27** |

## (6) माहिती अधिकाराची अर्ज प्रक्रिया

| | माहिती अधिकाराचा अर्ज भरतानाची प्रक्रिया | | श्री. जनमाहिती अधिकारी यांची प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 1. | अर्जाची भाषा : हिन्दी / इंग्रजी / राज्यभाषा | 1. | माहिती अर्ज स्विकारणे |
| 2. | अर्जाचे स्वरुप : लेखी / online / साध्या कागदावर / जोडपत्र 'अ' मध्ये दिलेल्या नमून्यानुसार | 2. | अर्जावरील पत्ता / दिनांक सही किंवा अंगठा तपासणी |
| 3. | अर्जाची फी : BPL असल्यास – निशुल्क इतर अर्जदार 10 रु शुल्क (BPL ने दारिद्र्य रेषेचा दाखला पूरावा म्हणून जोडावा.) | 3. | अर्ज वाचण्यायोग्य व समजण्यायोग्य आहे का? खात्री करणे, |
| 4. | फी भरण्याची पद्धत : रोख / डिमांड ड्रॉफ्ट / कोर्ट फी स्टॅम्प / चालान/बॅंकर्स चेक/ मनी ऑर्डर स्वरूपात | 4. | अर्जाची पोच पावती व फी भरल्याची पावती घ्यावी. |
| 5. | अर्जावर द्यावयाची इतर माहिती : केवळ संपर्कासाठी पत्ता व टेलीफोन क्रमांक असावा. (वैयक्तिक माहिती देण्याचे बंधन नाही) | 5. | मागणी केलेली मागणी उपलब्ध आहे की नाही ? ह्याची खात्री करावी. |
| 6. | शब्द मर्यादा : 150 शब्द | 6. | माहिती इतर सार्वजनिक प्राधिकरणाकडे असल्यास 5 दिवसांच्या आत त्या प्राधिकरणाकडे हस्तांतरण. |
| | | 7. | माहिती नाकारण्यासारखी असल्यास नाकारता येते. (कलम 8 व 9 प्रमाणे) |
| | | 8. | माहिती देण्यासाठी जो खर्च येईल तो अर्जदारास कळवावा. |
| | | 9. | माहिती नाकारल्यास कारणासहीत अर्जदारास |

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, 2005 नुसार फी चे स्वरुप**

| कलम | फी चे स्वरुप | फी |
|---|---|---|
| 6 (1) | माहिती मिळविण्यासाठी अर्ज करणे. | 10 रु. (धनाकर्ष/ धनादेश/न्यायालय फी मुद्रांक स्वरुपात) |
| 7 (5) | माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरुपात देणे. | |
| | 1) CD / DVD / डिस्क किंवा फ्लॉपी स्वरुपात माहिती देणे. | 50रु. + टपाल खर्च |
| | 2) मुद्रित स्वरुपातील माहिती/छायांकीत प्रती देणे. | 2 रु. (प्रत्येक छायांकित पृष्ठासाठी) + टपाल खर्च |
| 19 (1) | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज करणे. (अपील फी) | 20 रु. (धनाकर्ष/ धनादेश / न्यायालय फी मुद्रांक स्वरुपात) |

## आयोगाचा Q. Pattern व वर्गीकरण :

**आवाका :**

➢ आयोगाने आतापर्यंत खालील बाबींवरच प्रश्न विचारलेले आहेत.

**कलम 2 व्याख्या : 2(n) - त्रयस्थ पक्ष.**

**महत्वाची कलमे :**

| | |
|---|---|
| 3 | माहिती अधिकार |
| 6 | माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे |
| 7(1) | अर्ज कालावधी |
| 8 | माहिती प्रकट करण्याबाबतचा अपवाद |
| 8(1) b | न्यायालयाने प्रकाशित करण्यास मनाई. |
| 10 | पृथक्करणीयता |
| 12 | केंद्रिय माहिती आयोग |
| 13 (4) | मुख्य माहिती आयुक्त, पुनर्नियुक्तीस अपात्र |
| 15 (3) | राज्य माहिती आयुक्त – समिती |
| 17 (1) | पदावरून दूर करणे |
| 21 | सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण |
| 22 | अधिनियमाचा अधिभावी परिणाम |
| 23 | न्यायालयाच्या अधिकारितेस आडकाठी |
| 24 (1) | अधिनियम लागू नसणाऱ्या संघटना |

**सक्षम प्राधिकारी**

➢ लोकसभा अध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष

➢ विनंती अर्ज फेटाळल्यास – पर्याय

**केंद्रिय माहिती आयोग**

➢ अध्यक्ष + सदस्य

➢ पात्रता – निवड समिती

➢ पदच्युती (कलम, पद्धत)

➢ कलम / विशेषाधिकार

➢ नियुक्ती – राष्ट्रपती

**अपिल**

➢ पहिले अपिल – 30 दिवस – 45 दिवस

➢ दुसरे अपिल – 90 दिवस

**अर्जाचे स्वरूप**

**शिक्षा**

भारतातील प्रयत्न – महत्वाचे आयोग / समिती

जागतिक घडामोडी – देश आणि वर्षे

महाराष्ट्र प्रयत्न – सदस्य / अध्यक्ष

2019 मधील महत्वाचे बदल

**कायद्याविषयी थोडक्यात माहिती :**

➢ अंमलबजावणी

➢ घटनेतील तरतुद < 19 (1) a, 239

## (7) आयोगाचे प्रश्न

### राज्यसेवा मुख्य परीक्षा

**1. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 नुसार, राज्य लोक माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे असंतुष्ट व्यक्तीस, दुसरे अपील करण्याची तरतूद आहे जी राज्य माहिती आयुक्तांकडे ......... च्या आत करावी लागेल. (राज्यसेवा मुख्य 2024)**

1) नव्वद दिवस  2) साठ दिवस
3) तीस दिवस  4) छत्तीस दिवस

**2. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या ....... नुसार, माहितीसाठी विनंती करणाऱ्या अर्जदारास माहितीसाठी विनंती करण्यास कोणतीही कारणे देण्यास किंवा त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी, आवश्यक असेल त्याखेरीज अन्य कोणताही वैयक्तीक तपशील देण्यास भाग पाडता येणार नाही. (राज्यसेवा मुख्य 2024)**

1) कलम 6 (2)  2) कलम 6 (3) (i)
3) कलम 6 (1) (b)  4) कलम 6 (3) (ii)

**3. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या ......... नुसार मुख्य माहिती आयुक्त हे विहित कालावधीसाठी सदर पदावर राहतील आणि पुनर्नियुक्तीसाठी पात्र नसतील. (राज्यसेवा मुख्य 2023)**

1) कलम 13 (2)  2) कलम 13 (4)
3) कलम 13 (1)  4) कलम 13 (3)

**4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदींनुसार लोकसभेच्या बाबतीत सक्षम प्राधिकारी म्हणजे (राज्यसेवा मुख्य 2023)**

1) राष्ट्रपती  2) भारताचे सरन्यायाधीश
3) अध्यक्ष  4) पंतप्रधान

**5. जेव्हा पोट-कलम (1) अन्वये विनंतीचा अर्ज फेटाळण्यात आला असेल, त्या बाबतीत यथास्थिती, केंद्रीय जनमाहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी, माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तिस (राज्यसेवा मुख्य 2023)**

अ. असा विनंतीचा अर्ज फेटाळण्याची कारणे

| प्रश्न क्र. | 1 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 1 | 1 | 2 | 3 | 1 | | | | | | | | | | |

187. राज्य मुख्य माहिती आयुक्ताची व राज्य माहिती आयुक्ताची नियुक्ती मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या शिफारसी नुसार ..... द्वारे केली जाते. **(ASO मुख्य 2011)**

1) पंतप्रधान   2) राष्ट्रपती
3) राज्यपाल   4) विधान सभा

188. केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोगास कोणत्याही बाबींची चौकशी करताना चे अधिकार निहीत करण्यात आले आहे. **(ASO मुख्य 2011)**

1) फौजदारी न्यायालय
2) चौकशी न्यायालय (ट्रायल कोर्ट)
3) सत्र न्यायालय
4) दिवाणी न्यायालय

189. केंद्रीय जन माहिती अधिकारी अथवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णया विरुद्ध ..... दिवसात अपिल करता येते. **(ASO मुख्य 2011)**

1) 20   2) 30
3) 40   4) 40

190. अर्जदाराचे कोणतेही नुकसान अथवा अन्य हानीस जबाबदार सार्वजनिक प्राधिकरणाला भरपाई देण्याचे आदेश देण्याचा अधिकार ..... ला आहे. **(ASO मुख्य 2011)**

1) केंद्रीय माहिती आयोग / राज्य माहिती आयोग
2) राज्य जन माहिती आयोग
3) केंद्रीय जन माहिती आयेग
4) राज्यपाल

191. माहिती अधिकार अधिनियमाची एकूण ...... कलमे आहेत. **(ASO मुख्य 2011)**

1) 29   2) 30
3) 31   4) 32

192. माहितीचा अधिकार अधिनियम खाली माहिती मागण्याचा अधिकार कोणाला आहे ? **(ASO मुख्य 2011)**

1) विदेशी व्यक्ती   2) सर्व भारतीय नागरिक
3) इतर राष्ट्रांचे दूत   4) वरील सर्वांना

193. केंद्र सरकार द्वारे स्थापित गुप्तवर्ता व सुरक्षा संघटनांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू नाही, परंतू मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याच्या अभिकथनांशी संबंधित असणारी माहिती ..... दिवसांच्या आत द्यावी लागेल. **(ASO मुख्य 2011)**

1) 45   2) 30
3) 25   4) 20

194. माहिती अधिकार अधिनियम खाली अर्ज केलेल्या तारखेपासून मागीलवर्षा पूर्वीची माहिती मागता येते. **(ASO मुख्य 2011)**

1) राष्ट्रपती
2) राज्यपाल
3) केंद्रीय मुख्य माहिती आयोग
4) मुख्यमंत्री

**Notes**

| प्रश्न क्र. | 1 | 187 | 188 | 189 | 190 | 191 | 192 | 193 | 194 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 3 | 4 | 2 | 1 | 3 | 2 | 1 | 2 | | | | | | | |

# 2 महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015

## The Maharashtra Right to Public Service Act, 2015

### 1 लोकसेवा हक्क कायद्याविषयी भारतातील प्रयत्न

- **23 जून :** संयुक्त राष्ट्र लोकसेवा दिवस
- **21 एप्रिल :** राष्ट्रीय लोकसेवा दिवस
- **25 डिसेंबर :** सुशासन दिन

**मध्य प्रदेश :**

- लोकसेवा हक्क कायदा लागू करणारे भारतातील पहिले राज्य.
- लागू : 18 ऑगस्ट, 2010
- मध्य प्रदेश सरकारच्या या अधिनियमाचा संयुक्त राष्ट्रसंघाने पुरस्कार देऊन गौरव केला.
- मध्यप्रदेशात राज्यानंतर **उत्तर प्रदेश**, दिल्ली, बिहार, राजस्थान इ. राज्यांनी लोकसेवा हक्क कायदा पारित केला.
- **महाराष्ट्राने 28 एप्रिल, 2015** रोजी असा कायदा पारित करत **भारतातील 21 वे राज्य** ठरले.

### 2 महाराष्ट्रातील प्रयत्न

**डॉ. पी. एस. मीना समिती (2014)**

- तत्कालीन महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेली समिती.
- भारतातील विविध राज्यांच्या लोकसेवा हक्क कायद्याचा अभ्यास करुन महाराष्ट्रासाठी असा कायदा बनवणे.
- शासकीय कार्यकाळातील होणाऱ्या दप्तर दिरंगाईला आळा घालण्यासाठी व शासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास **प्रतिबंध अधिनियम, 2005** हा कायदा **2 मे, 2006** रोजी लागू केला, असा कायदा करणारे **महाराष्ट्र** हे देशातील **पहिलेच राज्य** ठरले होते.
- 1 मार्च 2017 ला प्रथम राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त म्हणून **'स्वाधिन क्षत्रिय'** यांची निवड
- महाराष्ट्रात या अधिनियमांतर्गत विविध 28 विभागांतील 506 लोकसेवा नागरिकांना पुरवल्या जातात.

| | | |
|---|---|---|
| इतर राज्ये | कर्नाटक | 1033 सेवा |
| | पंजाब | 588 सेवा |
| | आसाम | 506 सेवा |

- महाराष्ट्रामध्ये लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवांच्या इलेक्ट्रॉनिक वितरणासाठी दोन मार्गांनी अर्ज सादर करता येते.
  1) **महाराष्ट्र आर. टी. एस. उपयोजन (ॲप) :** हे मोबाईल ॲप आपल्या मोबाईलवर मोफत डाऊनलोड करुन नागरिक त्याद्वारे अर्ज करु शकतात.
  2) **आपले सरकार पोर्टल :** आपले सरकार संकेतस्थळावर अर्जदाराला आपली एकदाच नोंदणी करावी लागते व त्यानंतर अर्जदार सेवांची मागणी सदर संकेतस्थळावर अर्ज करु शकतो.
- आयोगाने सर्व विभागांचे नियमित मूल्यमापन करताना अतिशय चांगली कामगिरी, चांगली कामगिरी व असमाधानकारक कामगिरी अशी वर्गवारी केली आहे.
- सार्वजनिक सेवांच्या वितरणात सुधारणा व शासनाची भूमिका यावर आधारित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद दिनांक 21 व 22 डिसेंबर, 2019 रोजी नागपूर येथे पार पडली.
- या परिषदेत सार्वजनिक सेवांच्या वितरणात आणखी सुधारणा करण्यासाठी **नागपूर ठराव** पारित करण्यात आला.
- **ब्रीदवाक्य : आपली सेवा आमचे कर्तव्य**
  - **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम :**

**Exam Oriented facts :**

- अध्यादेश – 28 एप्रिल 2015
- विधानसभेत मंजुरी – 15 जुलै 2015
- राज्यपालांची अनुमती – 19 ऑगस्ट 2015
- गॅझेटमध्ये प्रकाशित – 21 ऑगस्ट 2015
- अंमलबजावणी – 28 एप्रिल 2015 पासूनच
- हा कायदा सर्व स्थानिक प्राधिकरणे, सार्वजनिक प्राधिकरणे, शासकीय विभाग व अभिकरणे यांना लागू मात्र खासगी संस्थांना लागू नाही.

**उद्दीष्ट्ये :**

1) भ्रष्टाचाराला आळा घालणे
2) प्रशासनात पारदर्शक – गतिमान व कालबद्ध सेवा पुरविणे
3) नागरिकांना तत्परतेने, सहज व सुलभतेने सेवा देणे
4) प्रशासन लोकाभिमुख करणे
5) पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देणे.
6) लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणणे.

## 3 कायदा - कलम 1 ते 30

| | |
|---|---|
| एकुण कलमे | 30 |
| प्रकरणे | नाहीत |
| परिशिष्ट | नाहीत |

**अधिनियमातील 30 कलमे खालीलप्रमाणे :**

| कलम | तरतूद |
|---|---|
| 1 | संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती. |
| 2 | व्याख्या. |
| 3 | लोकसेवा पदनिर्देशित अधिकारी, अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे. |
| 4 | नियम कालमर्यादेत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क. |
| 5 | नियम कालमर्यादेत लोकसेवा पुरविणे. |
| 6 | अर्जाच्या स्थितीची पाहणी. |
| 7 | लोकसेवा देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे. |
| 8 | अपील प्राधिकाऱ्यांची नियुक्ती. |
| 9 | अपील. |
| 10 | शास्ती. |
| 11 | शास्ती वसुलीची कार्यपद्धती. |
| 12 | वारंवार केल्या जाणाऱ्या कसुरीबद्दल पदनिर्देशित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यपद्धती. |
| 13 | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग घटित करणे. |
| 14 | पदावधी व सेवेच्या शर्ती. |
| 15 | मुख्य आयुक्तास किंवा आयुक्तांना पदावरून दूर करणे. |
| 16 | आयोगाचे अधिकार व कार्ये. |
| 17 | आयोगाच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही. |
| 18 | आयोगाकडे अपील करणे. |
| 19 | वार्षिक अहवाल. |
| 20 | नियत कालमर्यादेत लोकसेवा देण्याची संस्कृती विकसित करणे. |
| 21 | निधीत नियत वाटप. |
| 22 | शिस्तविषयक नियमांना तरतुदी पूरक असणे. |
| 23 | खोटी किंवा चुकीची माहिती, इत्यादी देणाऱ्या पात्र व्यक्ती विरुद्धची कार्यवाही. |
| 24 | निर्देश देण्याचा शासनाचा अधिकार. |
| 25 | सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. |
| 26 | अधिकारितेस रोध. |
| 27 | अधिनियम अन्य कायद्यांवर अधिभावी ठरणे. |
| 28 | नियम करण्याचा अधकार. |
| 29 | अडचणी दूर करण्याचा अधिकार. |
| 30 | सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 5 याचे निरसन व व्यावृत्ती. |


### कलम 1 : संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ.

1) **नाव :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015.
2) **व्याप्ती :** संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.
3) **अंमलबजावणी :** तो दिनांक 28 एप्रिल 2015 रोजी अंमलात (अध्यादेशाद्वारे) येईल.
4) **कार्यकक्षा :** कोणतेही कायदे, नियम, अधिसूचना, आदेश, शासन निर्णय अथवा अन्य कोणतेही संलेख यांच्या तरतुदींनुसार पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांना लागू असेल.


### कलम 2 : व्याख्या.

| कलम | तरतूद | व्याख्या |
|---|---|---|
| 2 (a) | मुख्य आयुक्त किंवा आयुक्त | कलम 13 (2) अन्वये नियुक्त केलेला राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त किंवा राज्य सेवा हक्क आयुक्त. |
| 2(b) | आयोग | कलम 13 (1) अन्वये घटित करण्यात आलेला **'महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग'.** |
| 2 (c) | सक्षम प्राधिकारी | शिस्तभंगविषयक प्राधिकारी किंवा यथास्थिती, नियंत्रक अधिकारी, असा आहे. |
| 2 (d) | विभाग | राज्य शासनाचा किंवा एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाचा विभाग, असा आहे. |
| 2 (e) | पदनिर्देशित अधिकारी | ज्याने पात्र व्यक्तीला लोकसेवा देणे आवश्यक आहे असा अधिकारी आहे. |
| 2 (f) | विभागीय आयुक्त | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 **कलम 6** अन्वये राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला आयुक्त. |

## 6 अर्ज प्रक्रिया




## 7 केंद्रिय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग - अध्यक्ष आणि सदस्य



# 8 आयोगाचे प्रश्न

## सयुक्त गट ब व क मुख्य परीक्षा

**1. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 चे खालीलपैकी कोणते कलम महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे अधिकार आणि कार्ये यांच्याशी संबंधित आहेत ?**

**(कंबाईन मुख्य गट ब 2024)**

1) कलम 12
2) कलम 14
3) कलम 15
4) कलम 16

**2. विधान I : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत निर्धारित वेळ मर्यादा म्हणजे कलम 4 अंतर्गत अधिसूचित केलेली वेळ मर्यादा.**

**विधान II : निवडणुकीच्या काळात राज्य सरकारकडून ही निर्धारित वेळ मर्यादा वाढविता येते.**

**योग्य पर्याय निवडा. (कंबाईन मुख्य गट ब 2024)**

1) विधान I बरोबर, विधान II चूक आहे
2) विधान II बरोबर, विधान I चूक आहे
3) दोन्ही विधाने बरोबर आहेत
4) दोन्ही विधाने चूक आहेत

**3. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या कलम 10 (2) मधील तरतुदीनुसार जर प्रथम अपील प्राधिकाऱ्याने कोणत्याही पुरेश्या किंवा वाजवी कारणाशिवाय अपीलावर निर्णय घेण्यात वारंवार कसूर केल्यास किंवा चूक करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्याला वाचविण्याचा गैरवाजवी प्रयत्न केल्यास मुख्य आयुक्त किंवा आयुक्त प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर किमान किती शास्ती लादू शकेल ?**

**(कंबाईन मुख्य गट ब 2023)**

1) किमान पाचशे रुपये
2) किमान पाच हजार रुपये
3) किमान दोन हजार पाचशे रुपये
4) किमान एक हजार रुपये

**4. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 मधिल तरतुदींनुसार जोड्या लावा : (कंबाईन मुख्य गट क 2023)**

| | कलम | | तरतूद |
|---|---|---|---|
| (a) | कलम 7 | (i) | नियत कालमर्यादेत लोकसेवा देण्याची संस्कृती विकसित करणे. |
| (b) | कलम 10 | (ii) | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग घटीत करणे. |
| (c) | कलम 13 | (iii) | लोकसेवा देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे. |
| (d) | कलम 20 | (iv) | शास्ती |

**पर्यायी उत्तरे :**

1) (a)-(ii), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(i)
2) (a)-(iii), (b)-(ii), (c)-(i), (d)-(iv)
3) (a)- (iii), (b)-(iv), (c)-(i), (d)-(ii)
4) (a)-(iii), (b)-(iv), (c)-(ii), (d)-(i)

**5. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 नुसार खालील विधानांचे अवलोकन करा.**

**(कंबाईन मुख्य गट ब (भाषा) 2022)**

**विधान I :** या कायद्याचे कलम 3, सार्वजनिक सेवांच्या वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या वापराशी संबंधित आहे.

**विधान II :** कलम 3(a) सार्वजनिक सेवांच्या वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाचे प्रकार प्रदान करते.

1) विधान I बरोबर; II चूक
2) विधान I चूक; II बरोबर
3) दोन्ही विधाने बरोबर
4) दोन्ही विधाने चूक

**6. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्याला प्रदान करता येईल**

**(कंबाईन मुख्य गट ब (भाषा) 2022)**

a. प्रोत्साहनपर रोख रक्कम
b. प्रशस्ती पत्र
c. सेवा अभिलेखात तशी नोंद
d. सेवेत पदोन्नती

**वरीलपैकी कोणते पर्याय बरोबर आहेत ?**

1) फक्त a, b, c
2) a, b, c आणि d
3) फक्त b, c, d
4) फक्त a, d

**7. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 चे कोणते कलम शासनास, सार्वजनिक प्राधिकरणास दिशानिर्देश जारी करण्यासाठी अधिकार प्रदान करतात ?**

**(कंबाईन मुख्य गट ब (भाषा) 2022)**

1) कलम 24
2) कलम 27(ब)
3) कलम 29
4) कलम 29(ब)

**8. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 ....... या तारखेला अंमलात आला.**

**(लिपिक – टंकलेखक मुख्य 2022)**

1) 15 ऑगस्ट 2015
2) 21 ऑगस्ट 2015
3) 28 ऑगस्ट 2015
4) 28 एप्रिल 2015

| प्रश्न क्र. | 2 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 4 | 2 | 1 | 4 | 4 | 1 | 1 | 4 | | | | | | | |

54. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अनुषंगाने वेगळेपण ओळखा. (लिपीक मुख्य 2018)**
1) पारदर्शक 2) कार्यक्षम
3) अभिव्यक्ती स्वातंत्र्य 4) समयोचित

55. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंतर्गत स्थापित केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाचे मुख्यालय कोठे असेल ? (ESI मुख्य 2017)**
1) पुणे 2) नागपूर
3) मुंबई 4) वरीलपैकी नाही

56. **महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना लोकसेवा देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 संमत करण्यात आला. त्याची खालीलपैकी कोणते उद्दिष्टे नाहीत ? (ESI मुख्य 2017)**
1) समयोचित आणि कार्यक्षम सेवा देणे.
2) या सेवा देणाऱ्या शासकीय विभागांच्या कामात पारदर्शकता आणणे.
3) अशा सेवा देणाऱ्या सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये उत्तरदयित्त्व आणणे.
4) वरील सर्व उद्दिष्टे आहेत.

57. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधि. 2015 च्या तरतुदी खालीलपैकी कोणाला लागू होत नाहीत ? (ESI मुख्य 2017)**
1) स्थानिक प्राधिकरणे 2) सार्वजनिक प्राधिकरणे
3) शासकीय विभाग 4) खाजगी संस्था

58. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अन्वये मुख्य आयुक्त किंवा आयुक्त यांना आदेशाद्वारे पदावरून दूर करण्याचे अधिकार कोणाला आहेत ? (ESI मुख्य 2017)**
1) राज्यपाल 2) मुख्यमंत्री
3) गृहमंत्री 4) वरीलपैकी नाही

59. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंतर्गत नियत कालमर्यादा म्हणजे कलम ..... अन्वये अधिसूचित केलेली कालमर्यादा होय. (ESI मुख्य 2017)**
1) 2 2) 3
3) 4 4) वरीलपैकी नाही

60. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 मधील कलम 18 च्या तरतुदीप्रमाणे द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्यापासून किती कालावधीच्या आत आयोगाकडे अपील करता येईल? (लिपीक मुख्य 2017)**
1) 30 दिवस 2) 45 दिवस
3) 60 दिवस 4) 90 दिवस

61. **लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रथम अपील खालील मुदतीत करता येते. (लिपीक मुख्य 2017)**
1) 30 दिवस 2) 60 दिवस
3) 90 दिवस 4) वरीलपैकी नाही

62. **लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत खालील आयोग गठीत केले जाते. (लिपीक मुख्य 2017)**
1) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग.
2) महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग.
3) महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग
4) वरीलपैकी एकपण नाही.

63. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार ज्या अधिकाऱ्यास दंड झालेला आहे, त्याने तो पुढील काळात भरावा. (लिपीक मुख्य 2017)**
1) 8 दिवसात 2) 30 दिवसात
3) 45 दिवसात 4) क्षमतेनुसार

64. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार मुख्य आयुक्त व आयुक्त यांची नेमणूक शिफारस समितीचे अध्यक्ष हे असतात. (लिपीक मुख्य 2017)**
1) राज्यपाल 2) मुख्यमंत्री
3) विधानसभा अध्यक्ष 4) विरोधी पक्ष नेता

65. **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 कोणत्या दिवशी अंमलात आला आहे ? (लिपीक मुख्य 2017)**
1) 15 ऑगस्ट 2) 28 एप्रिल
3) 20 डिसेंबर 4) 26 जानेवारी

| प्रश्न क्र. | 2 | 54 | 55 | 56 | 57 | 58 | 59 | 60 | 61 | 62 | 63 | 64 | 65 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 3 | 3 | 4 | 4 | 1 | 2 | 3 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | | | |

# 3

# माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000
## Information Technology Act - 2000

राष्ट्रपतीची सही : 9 जून, 2000 । लागू : 17 ऑक्टोंबर, 2000 । दुरुस्ती : 27/10/2009 व 26/5/2017

### (1) अधिनियमाचा उद्देश :

- इलेक्ट्रॉनिक व्यापार (Electronic Commerce) व्यवहार करण्यास कायदेशीर मान्यता देणे.
- शासकीय एजन्सीकडे दस्तऐवजाचे इलेक्ट्रॉनिक फायलिंग सुलभ करणे.
- विश्वसनीय इलेक्ट्रॉनिक्स रेकॉर्ड्सद्वारे शासकीय सेवा कार्यक्षमतेने पार पाडणे व त्यामध्ये सुधारणा आणणे.

- दिनांक 30 जानेवारी, **1997** रोजी **संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने इलेक्ट्रॉनिक वाणिज्याबाबतच्या मॉडेल कायद्याचा ठराव (UNCITRAL) संमत केला.** केंद्रसरकारचा कायदा या ठरावाच्या आधारावर बनविला आहे.
- या कायद्यात **13 प्रकरणे व 90 कलमे आणि 2 परिशिष्टे** आहेत (जी सुरुवातीला 4 होती.)

| क्र. | प्रकरण (Chapter) | कलमे |
|---|---|---|
| 1 | प्रारंभिक (Preliminary) | कलम 1 ते 2 |
| 2 | डिजीटल सही व इलेक्ट्रॉनिक सही | कलम 3 ते 3A |
| 3 | इलेक्ट्रॉनिक शासन | कलम 4 ते 10A |
| 4 | इलेक्ट्रॉनिक अभिलेखांचे आरोपण अभिस्विकृती व पाठवणी (Attribution, Acknowledgment and Despatch of Electronic Records) | कलम 11 ते 13 |
| 5 | सुरक्षित इलेक्ट्रॉनिक अभिलेख आणि सुरक्षित इलेक्ट्रॉनिक सही | कलम 14 ते 16 |
| 6 | सर्टिफाईंग ऑथोरिटीचे नियमन | कलम 17 ते 34 |
| 7 | इलेक्ट्रॉनिक सही प्रमाणपत्र | कलम 35 ते 39 |
| 8 | वर्गणीदारांची कर्तव्ये (Duties of Subscribers) | कलम 40 ते 42 |
| 9 | शिक्षा, भरपाई आणि निर्णय (Penalties and Adjudication) | कलम 43 ते 47 |
| 10 | सायबर अपील न्याधिकरण (The Cyber Regulations Appellate Tribunal) | कलम 48 ते 64 |
| 11 | अपराध व शिक्षा (Offences) | कलम 65 ते 78 |
| 12 | विशिष्ट प्रकरणी मध्यस्तांना जबाबदारीतून सूट | कलम 79 |
| 12A | विद्युत पुरावा परिक्षक (Examiner of Electronic Evidence) | कलम 79A |
| 13 | संकिर्ण (Miscellaneous) | कलम 80 ते 94. |

**कायद्याविषयी थोडक्यात, Exam Oriented :**

- या कायद्यात, एकुण 13 प्रकरणे व 94 कलमे – 4 परिशिष्ट्ये होती, मात्र **सध्या 13 प्रकरणे 90 कलमे** आहेत.
- परिक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व कलमे माहित असणे गरजेचे नाही मात्र सर्व प्रकरणे व त्यातील कलमे याबाबतचा अभ्यास असणे गरजेचे आहे.
- कलम 2 मध्ये विविध व्याख्या दिलेल्या आहेत ; त्यातील अति महत्वाच्या काही लक्षात ठेवणे गरजेचे आहे.
  - e. g. 2 (c), 2 (d), 2 (da), 2 (f ), 2 (g), 2 (m), 2 (nb), 2 (p), 2 (ta), 2 tb), 2 (ua), 2 (x), 2 (zc), 2 (zd) इ.
- तर यामधील कलम 90 पैकी काहीच महत्वाचे कलम आहेत, जे विचारलेले आहेत, वा विचारले जाऊ शकतात, ते Q. Paper Analysis करून ठरवावे.
- या कायद्यातील **प्रकरण IX, X, XI ही तीन प्रकरणे खूप** महत्वाची असून यातील कलमे व त्याबाबतच्या असणाऱ्या तरतुदी व शिक्षा याबाबत Comparative स्टडी करावा लागेल.
- **प्रकरण X, XI यामध्ये तर कलमे आणि शिक्षा यांचा तक्ता** आहे, तो व्यवस्थित समजून घेऊन लक्षात ठेवावा. त्यातील Comparison समजून घेऊन आयोगाचा Q. Pattern समजून facts पाठांतरावर भर द्यावा. **कंबाइन मुख्य च्या 'ICT' या Syllabus मधील भागात या कायद्यावर प्रश्न विचारले जातील.**

## (2) आयटी कायदा 2000 चे महत्त्व / सुधारणा

- माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 तयार करण्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी खाली दिलेले मुद्दे वाचा :
  1) हा कायदा इलेक्ट्रॉनिक नोंदींना कायदेशीर मान्यता देतो, ज्यामुळे भारतात ई-कॉमर्स आणि डिजिटल व्यवहारांमध्ये वाढ होते.
     - ➢ त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वाक्षऱ्यांना भौतिक स्वाक्षऱ्यांच्या कायदेशीर समतुल्य म्हणून स्थापित केले आहे.
  2) या कायद्याची रचना प्रमाणन प्राधिकरणांच्या नियंत्रकाची (सीसीए) स्थापना करून करण्यात आली आहे, ही एक सरकारी संस्था आहे जी डिजिटल स्वाक्षरी तसेच प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी आणि त्यांची सुरक्षा राखण्यासाठी जबाबदार आहे.
  3) या कायद्याने कंपन्यांना ग्राहकांची वैयक्तिक माहिती गोळा करताना किंवा वापरताना त्यांची संमती घेणे बंधनकारक केले आहे.
  4) हा कायदा प्रभावी झाल्यानंतर, एखाद्या अनधिकृत पक्षाकडून त्यांच्या वैयक्तिक डेटाचे नुकसान झाल्यास किंवा त्याचा गैरवापर झाल्यास व्यक्तींना भरपाई मागण्याचा अधिकार आहे.
  5) या कायद्याद्वारे, भारत सरकार सायबर गुन्हे, हॅकिंग आणि संगणक व्हायरस पसरवणे यांना गुन्हेगार ठरवू शकते.
  6) माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 ने सायबर अपीलीय न्यायाधिकरणाची स्थापना करण्यास देखील अधिकृत केले, ही एक विशेष अधिकृत संस्था आहे जी कायद्याअंतर्गत निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांविरुद्धच्या अपीलांचे निराकरण करण्यासाठी नियुक्त केली जाते.
- त्यामध्ये संप्रेषण नेटवर्क आणि पॉवर ग्रिडसह महत्त्वाच्या माहिती पायाभूत सुविधांचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी आहेत.

### 2000 च्या माहिती तंत्रज्ञान कायद्याचे खालील मुख्य उद्दिष्टे आहेत जी तुम्हाला माहित असायला हवीत :

- सरकारी सेवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कार्यक्षमतेने पुरवण्यास प्रोत्साहन देणे किंवा कंपन्या आणि नियमित व्यक्तींमध्ये डिजिटल व्यवहार सुलभ करणे.
- सुरक्षित सायबर लँडस्केप तयार करण्यासाठी डेटा चोरी, ओळख चोरी, सायबर स्टॉकिंग इत्यादी सायबर गुन्ह्यांवर दंड आकारणे.
- सायबर क्रियाकलाप आणि इलेक्ट्रॉनिक संप्रेषण आणि व्यापार माध्यमांवर लक्ष ठेवण्यासाठी नियम आणि कायदे तयार करणे.
- भारतीय आयटी/आयटीईएस क्षेत्रात विस्ताराला चालना देणे आणि नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देणे.

### माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 च्या ठळक वैशिष्ट्यांवर एक नजर टाका :

- इलेक्ट्रॉनिक कॉमर्सचे नियमन करण्यासाठी आणि सायबर गुन्ह्यांना शिक्षा करण्यासाठी केंद्र सरकारकडून या कायद्यातील तरतुदी लागू केल्या जातात.
- या कायद्यात मध्यस्थांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या तसेच त्यांच्या दायित्वापासून कोणत्या परिस्थितीत सूट मिळू शकते हे नमूद केले आहे.
- माहिती तंत्रज्ञान कायदा हा CERT-In (इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम) शी संबंधित आहे, जो सायबर सुरक्षा आणि सायबर घटना प्रतिसादासाठी जबाबदार असलेली एक नोडल एजन्सी आहे.

### आयटी कायदा 2000 आणि त्यातील सुधारणा

- कालांतराने तंत्रज्ञानाचा विकास होत असताना, भारतीय संसदेने सामाजिक गरजांशी जुळवून घेण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची गरज ओळखली, ज्यामुळे त्यात सुधारणा झाली.
- आयटी कायदा 2000 मध्ये दोन महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या ज्या तुम्हाला माहिती असाव्यात.

#### 1. 2008 ची दुरुस्ती

- ➢ 2008 च्या दुरुस्तीने आयटी कायदा, 2000 मध्ये कलम 66 A समाविष्ट केले.
- ➢ या कलमात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आक्षेपार्ह संदेश शेअर करण्यासाठी दंडाची रूपरेषा देण्यात आली होती.
- ➢ यामध्ये द्वेष निर्माण करणारा किंवा राष्ट्राच्या अखंडतेला आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करणारा कोणताही संदेश किंवा माहिती समाविष्ट आहे.
- ➢ तथापि, 'आक्षेपार्ह' संदेशांची व्याख्या करण्यात स्पष्टतेचा अभाव असल्याने अनेक व्यक्तींना अनावश्यक शिक्षा झाली, ज्यामुळे शेवटी हे कलम रद्द करण्यात आले.

#### 2. दुरुस्ती विधेयक 2015

- ➢ 2015 मध्ये, देशाच्या संविधानाने नागरिकांना हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्याच्या उद्देशाने कलम 66 A मध्ये सुधारणा करण्यासाठी आणखी एक विधेयक सादर करण्यात आले. नंतर ते संविधानाच्या कलम 19 चे उल्लंघन करणारे म्हणून घोषित करून हे साध्य करण्यात आले

- इलेक्ट्रॉनिक संप्रेषण आणि व्यवहारांना कायदेशीर मान्यता प्रदान करणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे आणि विविध सायबर गुन्ह्यांचे आणि ते करण्यासाठीच्या दंडाचे आरेखन करते.

making any modification in the regulation or both Houses agree that the regulation should not be made, the regulation shall thereafter have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment

**कलम 90 : नियम तयार करण्याचे राज्यशासनाचे अधिकार. (Power of State Government to make rules)**

- राज्य सरकार या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

## (4) रद्द करण्यात आलेली कलमे :

- **कलम 49 : [Composition of Cyber Appellate Tribunal.] Omitted by the Finance Act, 2017**
- **कलम 50 : [Qualifications for appointment as Chairperson and Members of Cyber Appellate Tribunal.]**
- **कलम 51 : [Term of office, conditions of service, etc., of Chairperson and Members.]**
- **कलम 52 : [Salary, allowances and other terms and conditions]**
- **कलम 52 A : [Powers of superintendence, direction, etc.]**
- **कलम 52 B : [Distribution of business among Benches.]**
- **कलम 52 C : [Power of Chairperson to transfer cases.]**
- **कलम 53 : [Filling up of vacancies.]**
- **कलम 54 : [Resignation and removal.]**
- **कलम 56 : [Staff of the Cyber Appellate Tribunal.]**
- **ही सर्व कलमे the finance act - 2017 ने रद्द करण्यात आली. जी सर्व Cyber Appillate Tribunal शी संबंधित होती.**

- **कलम 91 : [Amendment of Act 45 of 1860.]**
- **कलम 92: [Amendment of Act 1 of 1872.]**
- **कलम 93 : [Amendment of Act 18 of 1891.]**
- **कलम 94 : [Amendment of Act 2 of 1934.]**
- ही कलमे 2008 मधील दुरूस्तीमध्ये वगळण्यात आली.

## (5) दोन सेड्युल / अनुसूच्या

### THE FIRST SCHEDULE

[See sub-section (4) of section 1]

DOCUMENTS OR TRANSACTIONS TO WHICH THE ACT SHALL NOT APPLY

| Sl. No. | Description of documents or transactions |
|---|---|
| 1. | A negotiable instrument (other than a cheque) as defined in section 13 of the Negotiable Instruments Act, 1881 (26 of 1881). |
| 2. | A power-of-attorney as defined in section 1A of the Powers-of-Attorney Act, 1882 (7 of 1882). |
| 3. | A trust as defined in section 3 of the Indian Trust Act, 1882 (2 of 1882). |
| 4. | A will as defined in clause (h) of section 2 of the Indian Succession Act, 1925 (39 of 1925), including any other testamentary disposition by whatever name called. |
| 5. | Any contract for the sale or conveyance of immovable property or any interest in such property. |

### THE SECOND SCHEDULE

[See sub-section (1) of section 3A]

ELECTRONIC SIGNATURE OR ELECTRONIC AUTHENTICATION TECHNIQUE AND PROCEDURE

| Sl. No. | Description | Procedure |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| | | |

- [THE THIRD SCHEDULE.] Omitted by the Information Technology (Amendment) Act, 2008 (10 of 2009), s. 50 (w.e.f. 27-10-2009).
- [THE FOURTH SCHEDULE.] Omitted by s. 50, ibid. (w.e.f. 27-10-2009).

**आवाका : व्याख्या - कलम - 2 (f) :**

- महत्वाची प्रकरणे : X, XI, XIV
- महत्वाची कलमे : 3 A, 66 F, 24, 67 इ.
- शिक्षा / गुन्हा : 25000, 66 C नुसार, email हॅक करून बदनामी सायबर दहशतवाद, कलम 71 नुसार शिक्षा
- महत्वाच्या संकल्पना : ॲसिमेट्रीक क्रिप्टो सिस्टम, व्यक्तीगत चावी, ई-मेल बॉम्बींग, कळ जोडी.
- सायबर ॲपिलेट ट्रिब्युनल - निवड
- कायद्याचा उद्देश / हेतू
- तरतुर्दींचे उल्लंघन करणारी कंपनी असेल तर - तरतुदी कायद्याबाबत अंमलबजावणी, शिक्षा दर्जा अधिकारी
- सर्वोच्च न्यायालयामार्फत कलम 66 A रद्द बातल - 2015

## (6) आयोगाचे प्रश्न

### राज्यसेवा मुख्य परीक्षा

**1. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 नुसार सायबर दहशतवादासाठी कोणती शिक्षा निर्धारीत आहे ? (राज्यसेवा मुख्य 2024)**

1) पाच वर्षापर्यंत कारावास किंवा पाच लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही
2) जन्मठेपेपर्यंत वाढू शकणारी कारावासाची शिक्षा
3) दहा वर्षापर्यंत कारावास
4) सात वर्षापर्यंत कारावास किंवा दहा लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही

**2. माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 च्या ........ या कलमामध्ये इलेक्ट्रॉनीक स्वाक्षरी प्रमाणपत्र जारी करण्याच्या परवान्या संदर्भात तरतूद देण्यात आली आहे. (राज्यसेवा मुख्य 2024)**

1) कलम 42 2) कलम 21
3) कलम 41 4) कलम 67

**3. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 अंतर्गत अवशिष्ट दंड हा ...... (राज्यसेवा मुख्य 2021)**

1) रु.25,000 पेक्षा जास्त नाही
2) रु.50,000 पेक्षा जास्त नाही
3) रु.1,00,000 पेक्षा जास्त नाही
4) रु.1,00,000 पेक्षा जास्त आहे

**4. माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत ॲसीमेट्रीक क्रिप्टो सिस्टिम याचा अर्थ : (राज्यसेवा मुख्य 2019)**

1) संगणक यंत्रणा
2) दळणवळणासाठीचे उपकरण
3) संरक्षीत की-पेअर पद्धती
4) वरीलपैकी नाही

**5. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 मधील .... प्रकरणामध्ये अपिलीय न्यायाधिकरणाच्या तरतूदी केलेल्या आहेत. (राज्यसेवा मुख्य 2019)**

1) X
2) XI
3) XIV
4) वरीलपैकी कोणतेही नाही

**6. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 च्या कलम 66- क मध्ये ....... याबाबत उल्लेख आहे.(राज्यसेवा मुख्य 2019)**

1) गुन्ह्याच्या स्वरूपाचा संदेश दळणवळणाच्या माध्यमातून पाठविल्यास शिक्षा.
2) संगणकातील मूळ दस्तांमध्ये फेरफार करणे.
3) ओळख चोरी बाबत शिक्षा.
4) संगणक प्रणालीचा वापर करून स्वतः बाबत फसवणूक केल्यामुळे शिक्षा.

**7. A याने B चा e-mail हॅक करून C ची बदनामी केली. तर A ने माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 च्या अंतर्गत कोणता गुन्हा केला ? (राज्यसेवा मुख्य 2018)**

1) ई-मेल बॉम्बिंग
2) आयडेंटिटी थेफ्ट
3) ई-मेल फ्रॉड (फसवणूक)
4) ई-मेल स्पूफिंग

**8. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 मधील कलम ..... मध्ये सायबर दहशतवादासाठी शिक्षेची तरतूद दिलेली आहे. (राज्यसेवा मुख्य 2018)**

1) 66 B 2) 66 C
3) 66 F 4) वरीलपैकी नाही

**9. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 मधील कलम 2 (....) नुसार ॲसीमेट्रिक क्रिप्टो सिस्टम म्हणजे डिजिटल सहीसाठी प्रायव्हेट की आणि डिजीटल सहीची पडताळणी करण्यासाठी पब्लिक की यांचा समावेश असलेली सिक्युअर की पेअर पद्धती होय. (राज्यसेवा मुख्य 2018)**

| प्रश्न क्र. | 3 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 2 | 2 | 1 | 3 | 1 | 3 | 2 | 3 | 1 | | | | | | |

1) f
2) e
3) h
4) g

**10. सायबर अपिलेट ट्रीब्यूनलच्या अध्यक्ष व सदस्यांची निवड कोण करतात ? (राज्यसेवा मुख्य 2018)**

1) भारताचे राष्ट्रपती
2) राज्याचे राज्यपाल
3) भारताचे पंतप्रधानांच्या सल्ल्याने केंद्र सरकार
4) भारताचे सरन्यायधिशांच्या सल्ल्याने केंद्र सरकार

**11. खालीलपैकी कोणत्या कायद्यामध्ये सायबर टेररिझम या गुन्ह्याकरिता शिक्षेची तरतूद आहे ? (राज्यसेवा मुख्य 2017)**

1) भारतीय दंड संहिता, 1860
2) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973
3) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000
4) वरीलपैकी काहीही नाही.

**12. माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 अतंर्गत इलेक्ट्रॉनिक सिग्नेचर बाबत तरतूद खालील कलमात आहे. (राज्यसेवा मुख्य 2017)**

1) 3 अ
2) 5 ब
3) 9 क
4) 10 ड

**13. प्रमाणन अधिकारी म्हणजे कलम ...... अन्वये डिजीटल सही प्रमाणपत्र देण्यासाठी जिला लायसन्स देण्यात आले आहे अशी व्यक्ती. (राज्यसेवा मुख्य 2016 )**

1) 48
2) 35
3) 24
4) 26

**14. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 च्या कलम 66 A मध्ये ...... याबाबत उल्लेख आहे. (राज्यसेवा मुख्य 2016)**

1) दळणवळणाच्या या माध्यमातून आक्षेपार्ह संदेश पाठविल्यास शिक्षा
2) संगणकातील मुळ दस्तांमध्ये फेरफार करणे.
3) सायबर दहशतवादाकरिता शिक्षा
4) संगणक प्रणालीचा वापर करून तोतयेपणाने लबाडी केल्यामुळे शिक्षा

**15. प्रमाणबद्ध गुप्त प्रणाली म्हणजे सुरक्षित चाव्यांच्या जोडीची यंत्रणा ज्यात ..... ही अंकीय स्वाक्षरी निर्माण करते. (राज्यसेवा मुख्य 2016)**

1) स्वाक्षरी चावी
2) अंकीय चावी
3) मान्यताप्राप्त चावी
4) व्यक्तीगत चावी (खाजगी)

**16. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 च्या अंतर्गत खालीलपैकी कोणत्या कृत्याला ई-मेल बॉम्बिंग असे म्हणतात ? (राज्यसेवा मुख्य 2014)**

1) दुसऱ्याच्या मालकीच्या संगणक यंत्रणेत त्याच्या परवानगीशिवाय प्रवेश करणे.
2) एखाद्या संगणकामधे विषाणू पसरवणे
3) इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्याद्वारे लोकांमध्ये भिती पसरविणारी खोटी माहिती प्रसिद्ध करणे
4) वरीलपैकी कोणतेही नाही.

**17. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 कोणत्या खालील हेतूने अधिनियमित केला आहे ? (राज्यसेवा मुख्य 2013)**

1) माहिती पुरवणे
2) इलेक्ट्रॉनिक कॉमर्सला कायदेशीर मान्यता देणे
3) तंत्रज्ञान पुरवणे
4) वरील सर्व

**18. माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 च्या तरतूदींचे उल्लंघन करणारी एखादी कंपनी असली तरी त्याकरिता : (राज्यसेवा मुख्य 2013)**

a) ती कंपनी जबाबदार असेल व शिक्षेस पात्र असेल.
b) त्या कंपनीचा व्यवसाय करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीने त्या बाबीकडे दुर्लक्ष केले असल्यास तोही जबाबदार ठरेल व शिक्षेस पात्र असेल.
c) त्या कंपनीचा व्यवसाय करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीने मुकानुमती दिली असल्यास तो जबाबदार ठरेल व शिक्षेस पात्र असेल.

**पर्यायी उत्तरे :**

1) a आणि b
2) a आणि c
3) b आणि c
4) a, b आणि c

**19. सायबर दहशतवाद ह्या गुन्हाकरिता माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये कोणत्या शिक्षेची तरतूद केली आहे. (राज्यसेवा मुख्य 2012)**

1) तीन वर्षांचा कारावास
2) सात वर्षांपर्यंत कारावास
3) असा कारावास जो आजन्म कारावासापर्यंतचा असू शकतो.
4) वरीलपैकी काहीही नाही

**20. माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत उर्वरित शास्तीची शिक्षा ही खालीलप्रमाणे आहे. (राज्यसेवा मुख्य 2012)**

1) रु. 25 हजार
2) रु. 50 हजार
3) रु. 1 लाख
4) रु.5 लाख

| प्रश्न क्र. | 3 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 4 | 3 | 1 | 3 | 1 | 4 | 4 | 2 | 4 | 3 | 1 | | | | |

**21. कळ जोडी म्हणजे काय ? (राज्यसेवा मुख्य 2012)**

1) डिजीटल स्वाक्षरी तयार करण्याकरिता उपयोगी असलेली कळ जोडी ची कळ.
2) वैयक्तिक कळ व त्याच्याशी गणितीय संबंध असलेली सार्वजनिक कळ
3) डिजीटल स्वाक्षरीची सत्यता पडताळण्याकरिता उपयोगी असलेली कळ जोडी ची कळ.
4) वरीलपैकी काहीही नाही

**22. पुढे माहिती तंत्रज्ञान कायद्यासंदर्भात काही विधाने दिली आहेत ? (राज्यसेवा मुख्य 2012)**

अ) हा कायदा संपूर्ण भारतात तसेच गुन्हा घडल्यास भारताबाहेरही लागू आहे.
ब) गुन्ह्यांसाठी कारावासाची शिक्षा क्वचितच असून मुख्यत्वेकरून दांडाचीच शिक्षा आहे.
क) पोलीस अधिकारी फक्त संशयावरून वॉरंट शिवाय अटक करू शकतात.
ड) उप-अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पोलीस अधिकारी व केंद्र सरकारने नेमलेले अधिकारी, फक्त गुन्हेगाराला अटक करू शकतात.

**वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?**

1) अ आणि क फक्त सत्य आहे
2) ब आणि ड फक्त सत्य आहे.
3) सर्व विधाने असत्य आहेत.
4) सर्व विधाने सत्य आहेत.

**23. अ ने एकतर्फी प्रेमातून ब ला सतत मोठ्या प्रमाणात I Love u असे इतके ई-मेल पाठवले जेणेकरून ब चा ई-मेल अकाऊंट नष्ट झाला. अ ने गुन्हा केला काय? असल्यास शिक्षा काय? (सायबर विषयक कायद्यांतर्गत) खालील पर्यायातून उत्तर निवडा : (राज्यसेवा मुख्य 2012)**

1) अ ने काहीच गुन्हा केला नाही.
2) अ ने गुन्हा केला परंतु प्रेमापोटी केलेले कृत्य असल्याने शिक्षा नाही.
3) अ केला शिक्षा 3 वर्षेपर्यंत कारावास, आणि / किंवा रु. 5 लाखापर्यंत दंड.
4) अ ने गुन्हा केला परंतु त्रास देण्याचा उद्देश नसल्याने कारावास नाही दंड फक्त रु.1000.

**24. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 कलम 71 नुसार जी व्यक्ती नियंत्रक किंवा दाखला देणारे अधिकारी यांना परवाना किंवा डिजीटल सिग्नेचर मिळण्याकरिता चुकीची माहिती देतो त्याला ..... वर्षापर्यंत शिक्षा किंवा रुपये ..... पर्यंत दंड किंवा दोन्हीही होऊ शकते. (राज्यसेवा मुख्य 2015)**

1) तीन, पन्नास हजार
2) दोन, पन्नास हजार
3) दोन, तीन लाख
4) दोन, एक लाख

## संयुक्त गट ब व क मुख्य परीक्षा

**25. वर्षा खालील मुलांना अश्लीलता, खोटेपणा, किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर टाळण्यासाठी आय. टी. एक्ट, 2008 मधील ...... सेक्शन मदत करतो. (ASO मुख्य 2016)**

1) 67 बी
2) 78 बी
3) 97 बी
4) 88 बी

**26. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ? (ASO मुख्य 2015)**

1) सर्वोच्च न्यायालयाने 24 मार्च, 2015 रोजी सायबर कायद्यातील तरतूद काढून टाकली ज्या तरतूदीमुळे एखाद्या इसमाने खोडसाळपणे अपमानकारक मजकूर वेबसाईटवर टाकल्यास त्याला अटक करण्याचा अधिकार दिलेला होता.
2) सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम 66-A रद्दबादल ठरविले.
3) सर्वोच्च न्यायालयाने असे देखील म्हटले की, 66 - A ची तरतूद ही स्पष्टपणे भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य या मूलभूत हक्कावर परिणाम करणारी आहे.
4) सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम 69- आणि 79 या अन्य दोन तरतूदी देखील काढून टाकल्या आहेत.

**27. माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 अन्वये हॅकींग (Hacking) करण्याच्या गुन्ह्यासाठी ....... शिक्षा सुचविली आहे. (ASO मुख्य 2014)**

1) कमाल 3 वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा कमाल 2 लाख रुपये दंड अथवा दोन्ही
2) कमाल 3 महीने तुरुंगवास अथवा कमाल 2 लाख रुपये पर्यंत दंड अथवा दोन्ही
3) कमाल 3 वर्ष तुरुंगवास अथवा 1 लाख रुपये पर्यंत दंड अथवा दोन्ही
4) वरीलपैकी नाही

| प्रश्न क्र. | 3 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर | | 2 | 1 | 3 | 4 | 1 | 4 | 1 | | | | | | | | |